आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित

# कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरुर (का)

ता. शिरुर का. जि. बीड


मा. जयदत्तजी क्षीरसागर
(बी.ई मॅक)
सचिव

डॉ. तुपे संजय. के.
( एम एस्सी.पीएच. डी)
प्रभारी प्राचार्य

Ph. No. (02444) 259590 E-mail:- kalikadevicollege@gmail. com


जा. क्र. कामाशि/2021-2022/265 दि: 27/10/2021

प्रति,

मा.सहसंचालक,
(उच्च शिक्षण)
औरंगाबाद विभाग औरंगाबाद.

**विषय : कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) समितीची माहिती स्विकार करणे बाबत....**

**संदर्भ :**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सविनय सादर की, महाविद्यालयामध्ये कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) समिती स्थापन केलेली आहे. शैक्षणिक वर्षे 2020-21 या वर्षामध्ये महाविद्यालयामध्ये महिला व मुलींची कोणतीही तक्रार आलेली नाही. निरंक आहे. त्याच बरोबर शैक्षणिक वर्षे 2021-22 मध्ये महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

तरी मा. सहसंचालक साहेबांनी माहितीचा स्विकार करावा ही विनंती.

प्राचार्य

I/C Principal
Kalikadevi Arts, Commerce & Sci.
College, Shirur (Ka), Dist. Beed.

**सोबत :**

1) महिला तक्रार निवारण समिती
शै. वर्षे 2021-22 ची प्रत

Scanned by TapScanner

# महिला तक्रार निवारण समिती 2021-2022

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या निर्देशानुसार कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरुर (का) येथे दि. 01/09/2021 रोजी अधिनियम 2013 च्या कलम चार (4) नुसार अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली.

या समितीचे सदस्य पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
| 1) | प्राचार्य डॉ. तुपे एस.के. | महाविद्यालय प्रमुख |
| 2) | डॉ. लोमटे एस.बी. | अध्यक्ष |
| 3) | डॉ. डोंगळीकर सी.व्ही. | सदस्य |
| 4) | सहा. प्रा. सय्यद ए.ए. | सदस्य |
| 5) | सहा. प्रा. गुंडे व्ही.बी. | सदस्य |
| 6) | श्री. बहादुर्गे एल.व्ही. | सदस्य |
| 7) | कु. महाडीक संगिता | विद्यार्थीनी प्रतिनिधी |
| 8) | ॲड. तवटे जे.सी. | सदस्य |
| 9) | श्री. रमेश कदम | सदस्य |

शैक्षणिक वर्षे 2020-2021 या कालावधीत महाविद्यालयामध्ये महिला व मुलींची कोणतीही तक्रार आलेली नाही निरंक आहे.

समन्वयक

महिला तक्रार निवारण समिती

डॉ. लोमटे एस.बी.

प्राचार्य

Principal
Kalikadevi Arts,Commerce and Sci. College, Shirur (Ka),Dist.Beed

Scanned by TapScanner

**प्रवेशासंबंधी नियम:-**

- ❊ प्रवेश घेताना अर्जासोबत पुढील प्रमाणपत्राच्या मुळ व साक्षांकित प्रति आवश्यक जोडाव्यात.
- ❊ शालांत किंवा विद्यापीठ परीक्षेचे गुण पत्रक (मार्क मेमो).
- ❊ शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र (टी.सी.).
- ❊ वर्गीकृत जातीदर्शक प्रमाणपत्र (Caste Certificate)
- ❊ सर्व वर्गासाठी ७५०००/- रुपयाचे उत्पन्न असल्याचा तत्संबंधी योग्य अधिकाऱ्याकडून वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
- ❊ शिक्षणात खंड पडल्यास प्रमाणपत्र (गॅप सर्टिफिकेट).
- ❊ दुसऱ्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातून अगर दुसऱ्या प्रांतातून स्थलांतर करीत असल्यास त्याचे प्रमाणपत्र. (Migration Certificate)
- ❊ नौकरी करीत असल्यास वरिष्ठ अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.
- ❊ पालक, वडील, आई हयात नसल्यास मृत्यूचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

प्रवेशासंबंधी आवश्यक लागणारी प्रमाणपत्रे त्वरित सादर करावीत. प्रमाणपत्रे विद्यापीठाकडे पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) मिळविण्याकरिता पाठविली जातात. त्यात काही चुका व उणिवा राहिल्यास विद्यार्थी जबाबदार राहील.

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी महत्वाच्या सूचना

१) विद्यार्थ्याला महाविद्यालयात मिळालेला प्रवेश विद्यापीठाकडून अथवा उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची अंतिम मान्यता येईपर्यंत तात्पुरता समजला जाईल. प्रमाणपत्रे देण्यास उशीर लागल्यामुळे किंवा मान्यता मिळू शकली नाही तर त्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहणार नाही.

२) महाविद्यालयात घेतलेला प्रवेश रद्द करावयाचा असल्यास संपूर्ण फिस भरावी लागेल.

३) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण होणारा विद्यार्थी प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतो.

४) पूर्ण फीस धारक विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी पूर्ण फीस भरणे आवश्यक आहे.

५) ज्यांचे पालक स्वातंत्र्य सैनिक किंवा प्राथमिक शिक्षक आहेत त्यासंबंधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६) विद्यार्थ्यांना या महाविद्यालयात पूर्नप्रवेश (Readmission) घेता येणार नाही.

७) नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांने प्रवेश घेण्यापुर्वी प्राचार्यांची संमती घेतली पाहिजे. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर नोकरी लागल्यास तसे महाविद्यालयास त्वरित कळविले पाहिजे.



Scanned by TapScanner

८) महाविद्यालयीन कामासाठी महाविद्यालयातील विहीत नमुन्यातील अर्ज ग्राहक भांडार मधून घेणे.

९) महाविद्यालयातील मूळ गुणपत्रक योग्य ती तपासणी झाल्याशिवाय मिळणार नाहीत.

१०) महाविद्यालयातील प्रत्येक काम विद्यार्थ्याने स्वत: येवून करुन घेणे, सोबत ओळखपत्र आवश्यक आहे.

११) महाविद्यालयातील कोणत्याही खिडकीसमोर विद्यार्थ्यांने रांगेत येणे.

१२) विद्यार्थ्यांनी स्वत:ला लागतील तेवढ्या सत्यप्रती काढून ठेवणे, महाविद्यालयाकडून सत्यप्रती मिळणार नाहीत.

१३) पुढील शिक्षणासाठी दिलेला मुळ दाखला नियमानुसार परत देता येत नाही.

१४) विद्यार्थ्यांना कामात काही अडचण आल्यास तक्रार पेटीत अर्ज टाकणे.

१५) महाविद्यालयाच्या तासिकेस/प्रांगणात विद्यार्थ्यांनी उपस्थित राहते वेळी ओळखपत्र सोबत असणे आवश्यक आहे.

१६) अन्य प्रकारचा शिष्यवृत्ती फॉर्म, इबीसी,जिओआय इत्यादी दिलेल्या वेळेच्या आत भरणे आवश्यक आहे.

१७) प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षा फॉर्म स्वत: येवून भरणे आवश्यक आहे.

१८) इलीजीबीलीटी फॉर्म सोबत पाठवण्यात आलेले मूळ गुणपत्रक शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत दिले जाणार नाहीत.

१९) दुसऱ्या विद्यापीठातील बोर्डातील विद्यार्थ्यांना मायग्रेशन प्रमाणपत्र सोबत असल्याशिवाय महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार नाही.

२०) विद्यार्थ्यांची हजेरी ७५% असणे आवश्यक आहे.

२१) परीक्षा फॉर्म न भरल्यास शिष्यवृत्ती धारकाची रक्कम शासनास परत केली जाईल.

२२) तासिका व प्रात्यक्षिकास सतत अनुपस्थिती आढळून आल्यास महाविद्यालयातून नाव कमी करण्यात येईल.

२३) महाविद्यालयाचा दाखला मागणी अर्ज दिल्यापासून तीन दिवसानंतर मिळेल.

२४) महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांशी उद्धटपणाची वर्तणूक केल्याचे दिसून आल्यास संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द केला जाईल.

२५) तंबाखू, पान इ. अन्य प्रकारचे गुटखे खाऊन महाविद्यालयात येवू नये, असे आढळून आल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

२६) तासिकेची घंटा वाजून ५ मिनिटानंतर तासिकेस बसता येणार नाही तसेच कोणत्या व्हरांड्यात फिरता येणार नाही.



Scanned by TapScanner